**दहशतवादग्रस्त व दंगलग्रस्त आपदग्रस्तांना मदत देऊन त्यांचे पुनर्वसन करणे**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : आरएलएफ/१२-०८/प्र.क्र.२९८/म-३**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक : १ डिसेंबर, २००८**

वाचा :- शासन निर्णय क्र. आरएलएफ-११-०३/प्र.क्र.३१०/म-३, दिनांक २४ ऑगस्ट, २००४

**शासन निर्णय :-**

दहशतवादी घटना व दंगलीतील बाधित व्यक्तिंना मदत देण्याबाबत शासन निर्णय क्र. आरएलएफ-११-०३/प्र.क्र.३१०/म-३, दिनांक २४ ऑगस्ट, २००४ अन्वये मर्यादा व कार्यपध्दती विहित करण्यात आलेली आहे. बदलत्या परिस्थितीत सदर शासन निर्णयान्वये अशा घटनामधील मृत व्यक्तींच्या वारसांना / कुटुंबियांना द्यावयाच्या रुपये १,००,००० या मदतीच्या रकमेत वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. या प्रकरणी सर्वंकश विचारांती दहशतवादी घटना व दंगलीतील मृत व्यक्तींच्या वारसांना / कुटुंबियांना द्यावयाच्या मदतीच्या रकमेत प्रती व्यक्ती रुपये १,००,००० ऐवजी रुपये ५,००,००० वाढ करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. सदर आदेश निर्गमनाच्या दिनांकापासून तात्काळ अंमलात येतील. या आदेशाचा लाभ दिनांक २६.११.२००८ ते २८.११.२००८ या कालावधीत मुंबई शहरात घडलेल्या दहशतवादी हल्ल्यातील मृत व्यक्तींच्या वारसांना / कुटुंबियांना अनुज्ञेय राहील. शासन निर्णय क्र. आरएलएफ-११-०३/प्र.क्र.३१०/म-३, दिनांक २४ ऑगस्ट, २००४ मधील अन्य तरतुदीमध्ये कोणताही बदल होणार नाही.

२. सदर आदेश वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ५४१/०८/व्यय-९, दिनांक २.१२.२००८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**( जि. शां. वाणी )**
अवर सचिव
महसूल व वन विभाग

प्रति,
विभागीय आयुक्त (सर्व)
जिल्हाधिकारी (सर्व)

D:\wani\email.doc
रोटा/एच-२४०४[१०००-१२-२००८]-१